ePaper
इराण होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर टोल लावणार, जागतिक व्यापारावर दूरगामी परिणाम होणार?

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

अजितदादांनंतर बारामतीच्या सहकारी संस्था वाऱ्यावर

WWW.MAHAENEWS.COM | रविवार | दि. 24 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तिसऱ्यांदा पेट्रोल-डिझेलची दरवाढ, वर्क फ्रॉम होम विषयावर घेरलं

# महागाईवरून पंतप्रधान मोदींना काँग्रेसचे चार प्रश्न

महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**सरकारने शनिवारी पुन्हा एकदा (तिसऱ्यांदा) पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ केल्यानंतर काँग्रेसने मोदी सरकारवर जोरदार टीका केली. भारतातील सामान्य ग्राहकांचे महागाईपासून संरक्षण करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच ऊर्जा धोरण आणि परराष्ट्र संबंध ज्या पद्धतीने केंद्र सरकार हाताळत आहे, त्यावरही काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.**



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राजीव गौडा आणि प्रवक्त्या डॉली शर्मा यांनी आज दिल्ली येथे पत्रकार परिषद घेतली. इंधन दरवाढ करून महागाईला चालना देण्याऐवजी केंद्र नागरिकांना वाढत्या किमतींपासून वाचवणे हे सरकारचे नैतिक आणि आर्थिक कर्तव्य आहे. केंद्र सरकार आर्थिक आणि राजनैतिक अशा दोन्ही पातळ्यांवर अपयशी ठरले आहे, असे राजीव गौडा म्हणाले.

२०१४ पासून कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली होती. तेव्हा त्याचा फायदा तुम्ही भारतीय ग्राहकांना का दिला नाही? असा प्रश्न गौडा यांनी सरकारला विचारला. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील तेल कंपन्यांना प्रचंड नफा कमावण्याची परवानगी देण्यात आली. तर दुसरीकडे सामान्य ग्राहकांना मात्र इंधनाचे वाढीव दर मोजावे लागत आहेत, असा आरोप गौडा यांनी केला.

भारताला लागणाऱ्या इंधनापैकी जवळपास ८० टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत चढउतार आल्यानंतर आपल्याला भोगावे लागतात. त्यात केंद्र आणि राज्य सरकारांनी लादलेला कर आणि चलनातील चढ-उतार यामुळे किरकोळ इंधनाच्या किमतींवर अनेकदा परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती कमी असतानाही भाजपाप्रणीत सरकारने पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क वाढवले, असा आरोप विरोधी पक्षांनी केला.

गौडा यांनी केंद्र सरकारच्या ऊर्जा धोरणावर टीका केली. आंतरराष्ट्रीय तेल पुरवठादारांशी व्यवहार करताना भारताने आपल्या सार्वभौमत्वाशी तडजोड केल्याचा आरोप त्यांनी केला. सरकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पसंतीनुसार तेल आयात करण्याचा निर्णय घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांनंतर भारताने इराणकडून होणारी कच्च्या तेलाची आयात लक्षणीयरित्या कमी केल्याचा उल्लेख केला. तसेच रशियाकडून ज्या पद्धतीने आयात केली जाते, त्या धोरणावरही टीका केली. भारत आपल्या ऊर्जाविषयक हितांचा स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी परवानगी मागत आहे, असाही आरोप गौडा यांनी केला.

राजीव गौडा यांनी तिसऱ्या प्रश्नात मोदी सरकारने अर्थव्यवस्थेची स्थिती आणि महागाईबाबत जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. "सर्व काही चांगले चालले आहे, असे सांगून तुम्ही भारतातील जनतेची सातत्याने फसवणूक केली. त्यांनी मतदान करताच तुम्ही त्यांच्या पाठीत खंजीर खुपसत आहात", असा आरोप गौडा यांनी केला.

## कोणते महत्वाचे चार प्रश्न?

१) २०१४ पासून कच्च्या तेलाचे दर कमी असताना मोदी सरकारने त्याचा फायदा भारतीय ग्राहकांना का होऊ दिला नाही?

२) आपण कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात विविधता का आणली नाही?

३) मोदी सरकार भारताच्या जनतेची फसवणूक का करत आहे?

४) वाढती महागाई, दरवाढ आणि मंदावलेली अर्थव्यवस्था हाताळण्यासाठी सरकार काय करत आहे?

## समस्या सोडवण्यासाठी काय उपायोजना करणार?

वाढती महागाई आणि ढासळलेली अर्थव्यवस्था ठीक करण्यासाठी आताच्या आता पावले उचला, असे आवाहनही गौडा यांनी चौथ्या प्रश्नाच्या माध्यमातून केले आहे. "वाढत्या इंधन दरामुळे महागाईच्या परिणामापासून नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना राबवायला हव्यात. चलनवाढ, महागाई आणि अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती रोखण्यासाठी सरकार काय करत आहे?", असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हा सगळा दोष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आहे. त्यांनीच यात काहीतरी करणे गरजेचे असून ही समस्या आताच्या आता सोडवावी लागेल, असेही ते म्हणाले. प्रवक्त्या डॉली शर्मा यांनी देशात उसळलेल्या महागाईची यादीच दिली. दूध, धान्याचे पीठ, तांदूळ, तूरडाळ, भाज्या आणि खाद्य तेल यांच्यात किती टक्के दर वाढ झाली आहे, याची माहिती त्यांनी दिली. देशात भीषण महागाईने टोक गाठलेले असताना सरकार फक्त पीआर करण्यात व्यस्त आहे, असाही आरोप त्यांनी केला.

# अजितदादांनंतर बारामतीच्या सहकारी संस्था वाऱ्यावर

## संस्था सध्या कणखर, सडेतोड आणि पकड असलेल्या नेतृत्वाअभावी वाऱ्यावर सुटल्याचे चित्र

**महाईन्यूज । पुणे**

**अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने बारामतीच्या केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर इथल्या बलाढ्य सहकारी संस्थांच्या चळवळीत एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या संस्था सध्या कणखर, सडेतोड आणि पकड असलेल्या नेतृत्वाअभावी वाऱ्यावर सुटल्याचे दिसत आहे.**



### केवळ वारशाने सहकार वाचणार नाही

केवळ सत्तेचा तामपट घेऊन आलेला वारसदार बारामतीची सहकार चळवळ वाचवू शकत नाही. जो कोणत्याही दबावाला बळी न पडता संस्थेच्या हिताचे निर्णय घेईल. चुकीचे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला अजितदादांसारखे भर चौकात किंवा भरबैठकीत सुनावण्याची धमक असणारा नेता हवा, ज्याला केवळ भाषणे करता येत नाहीत, तर सहकार कळतो आणि शेतकऱ्यांच्या घामाची किंमत कळते, अशा नेत्याची गरज आहे. येत्या काळात बारामतीच्या सहकार क्षेत्रासाठी केवळ राजकीय वारसा पुरेसा ठरणार नाही, तर संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम ठेवणारे आणि कार्यकर्त्यांना एकत्र बांधून ठेवणारे नेतृत्व आवश्यक ठरणार आहे.

माळेगाव, सोमेश्वर हे सहकारी साखर कारखाने, बारामती तालुका दूध संघ, तालुका खरेदी-विक्री संघ, बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती सहकारी बँक, स्थानिक पातळीवरील लहान-मोठ्या सहकारी संस्थांवर वर्षानुवर्षे अजितदादांचा थेट आणि वचक असलेला ताबा होता. पण, आता हा वचक कायम ठेवण्यासाठी प्रशासकीय पकड असलेला आणि तितकाच सडेतोड निर्णय घेणारा कणखर नेता बारामतीला हवा आहे.

अजितदादांच्या चुकीला माफी न देण्याच्या स्वभावामुळे कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या या सहकारी संस्था केवळ 'दादा' नावाच्या वलयावर सुरळीत चालल्या नाहीत, तर दादांच्या 'पोलादी पकडी'मुळे टिकून राहिल्या, विस्तारल्या आणि सभासदांना त्यांचा प्रत्यक्ष लाभ झाला आहे. लाखोंच्या मताधिक्याने दादा विजयी होत. त्यामध्ये सहकारातील लाभामुळे सुखावलेल्या सभासदांचा मोठा वाटा होता.

अजितदादांचा शब्द अंतिम असायचा. त्यामुळे स्थानिक पातळीवरील नेत्यांना गटबाजी करण्याची हिंमत होत नव्हती. आता दादांच्या अनुपस्थितीत प्रत्येक नेता स्वतःला 'किंगमेकर' समजून संस्थांवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहे. संस्थांवर वर्चस्वासाठी अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याची शक्यता आहे.

जर अंतर्गत वाद वाढले, तर शेतकऱ्यांच्या हक्काच्या संस्था डबघाईला यायला वेळ लागणार नाही. सहकारात 'राजकारण' आले की 'आर्थिक शिस्त' बिघडते, हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. बारामती याला अपवाद राहिली ती केवळ दादांच्या सडेतोड भूमिकेमुळे. आता जर सैल कारभार झाला, तर संस्थांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते?

अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे सोपे नाही. सध्या पवारांच्या घरातील नव्या पिढीकडे किंवा स्थानिक नेत्यांकडे राजकीय महत्त्वाकांक्षा असली, तरी सहकार क्षेत्रातील तांत्रिक बाबी, बँकिंगचे नियम आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर वचक ठेवण्याचा अनुभव अजूनही कमी पडतो आहे.

आज परिस्थिती बदलली आहे. संस्थांची नावे बदलून किंवा त्यांचे नामकरण 'अजितदादा' करून त्यांच्या आठवणी नक्कीच जपल्या जातील; पण संस्थांचा गाडा पुढे नेण्यासाठी काम करणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे.

प्रत्यक्ष मैदानात उतरून रोज सकाळी संस्थांचा आढावा घेणारा 'कमांडिंग लीडर' बारामतीला हवा आहे. पवारांच्या घरातील कोण ही जबाबदारी घेणार? यावरच पुढचे चित्र अवलंबून असेल. आगामी काळात बारामतीने योग्य आणि कणखर नेतृत्व निवडले नाही, तर सहकार क्षेत्रात बारामतीचे जे अव्वल स्थान आहे, त्याला मोठा धक्का बसू शकतो. आता वेळ केवळ भावुक होण्याची नाही, तर बारामतीचे वैभव टिकविण्यासाठी खंबीरपणे पावले उचलण्याची गरज आहे.

# ६ वर्षीय मुलीचे मृत्यू प्रकरण; दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सखोल चौकशी करा

**महाईन्यूज । पुणे**

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डोळ्यांच्या शस्त्रक्रियेदरम्यान सहा वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याप्रकरणी महापालिकेच्या आरोग्य विभागाने चार सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्यामध्ये महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत बोठे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता सांगडे, डॉ. किरण म्हंकाले आणि डॉ. आरती कदम यांचा समावेश आहे. या समितीला सात दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**




### दीनानाथ मंगेशकरकडे सुमारे ३२ कोटी रुपयांची थकबाकी

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडे पुणे महानगरपालिकेची सुमारे ३२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याची बाब समोर आली आहे. ही वसुली प्रक्रिया का रखडली आणि त्यामागील प्रशासकीय कारणे काय आहेत?, सर्वसामान्य करदात्याकडे पैसे थकले की महापालिका त्यावर जप्तीची कारवाई करते, मग या रुग्णालयाकडे असलेल्या थकबाकी बद्दल महापालिका डोळेझाक का करते, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी या संदर्भात आदेश दिले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा येथील रहिवासी असलेली प्रियांशी बागडे (वय ६ वर्षे) हिला डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी दीनानाथ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या शस्त्रक्रियेदरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी रुग्णालय प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी केली होती. या प्रकरणाची दखल घेत महापालिका प्रशासनाने चौकशी सुरू करत रुग्णालय प्रशासनाला नोटीस बजावली होती. त्यानुसार रुग्णालय प्रशासनाला संबंधित प्रकरणाची सर्व वैद्यकीय कागदपत्रे, उपचारांचे रेकॉर्ड आणि शस्त्रक्रियेचा तपशील आरोग्य विभागाकडे त्वरित जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते. घटनेशी संबंधित सर्व माहिती, केस पेपर आणि वैद्यकीय रेकॉर्ड २४ तासांच्या आत सादर करण्याचे आदेश दिले गेले होते. त्यानुसार, दीनानाथ रुग्णालयाने रुग्णाची संपूर्ण समरी महापालिका प्रशासनाला पाठविली आहे. आता या प्रकरणाच्या चौकशीसाठी महापालिका आरोग्य विभागाने चार जणांची प्राथमिक चौकशी समिती स्थापन केली आहे. या चौकशी समितीमध्ये दोन बालरोगतज्ज्ञ आणि एका भूलतज्ज्ञाचा समावेश आहे. या प्रकरणाची चौकशी करून सात दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या सहा वर्षीय मुलीच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी केली. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांची भेट घेऊन खासदार लंके यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सखोल चौकशी करण्याचे निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश विद्यार्थी अध्यक्ष सुनील गव्हाणे, ऋषिकेश बालगुडे, योगीराज गाडे, सुरज मोरे, विक्रम ननावरे, रणजित दळवी, अमोघ ढमाले यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. मंगेशकर रुग्णालयाच्या कार्यपद्धतीबाबत अनेक तक्रारी येत आहेत.

# सप्टेंबर अखेरपर्यंत पोस्को कोर्ट इमारत पूर्ण करा!

## महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी आढावा बैठकीत टाटा प्रोजेक्ट्सची केली कानउघाडणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पुणे जिल्हा न्यायालयाच्या शिवाजीनगर येथील रखडलेल्या पोस्को कोर्ट इमारतीच्या बांधकामावरून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) कडक भूमिका घेतली आहे.**




महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी शुक्रवारी (दि. 22) झालेल्या आढावा बैठकीत कंत्राटदार कंपनी टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडची कानउघाडणी करत सप्टेंबर 2026 अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसे न झाल्यास कंत्राट रद्द करून कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.

शिवाजीनगर न्यायालय आवारात तळमजला अधिक चार मजली अशा कोर्ट इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या कामाचा आढावा महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. बैठकीला पीएमआरडीएचे मुख्य महानगर अभियंता रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता योगेश कुलकर्णी, संबंधित अधिकारी तसेच टाटा प्रोजेक्ट्सचे प्रतिनिधी उपस्थित होते.

PUNE METROPOLIS

न्यायालयाने सुचविलेल्या बदलांसह संपूर्ण बांधकाम सप्टेंबरअखेर पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बांधकामातील सातत्यपूर्ण दिरंगाईमुळे पीएमआरडीएने कठोर भूमिका घेतल्याने आता कंत्राटदार कंपनीसमोर निर्धारित मुदतीत काम पूर्ण करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या प्रकल्पामुळे न्यायालयीन कामकाज अधिक गतिमान होण्यास मदत होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. नवीन इमारतीमध्ये आधुनिक सुविधा, प्रशस्त न्यायालय कक्ष आणि नागरिकांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा व्यवस्था उभारण्यात येणार आहे. वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर ही इमारत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले. कामाच्या प्रगतीबाबत दर पंधरा दिवसांनी आढावा घेण्याचे निर्देशही महानगर आयुक्तांनी दिले. बांधकामासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वाढविण्याचे आदेश संबंधित कंपनीला देण्यात आले आहेत.

### निर्धारित मुदतीत काम पूर्ण करण्याचे आव्हान

या प्रकल्पासाठी पीएमआरडीएने टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडची 9 कोटी 71 लाख 90 हजार 915 रुपयांचे निविदा मंजूर केली होती. करारानुसार हे बांधकाम 3 जुलै 2025 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, बांधकामात सातत्याने विलंब होत असल्याने पीएमआरडीएने कंपनीवर दंडात्मक कारवाई करत 30 मार्च 2026 पर्यंत मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपल्यानंतरही काम पूर्ण न झाले नव्हते. दरम्यान, कंपनीने बैठकीत 34 लाख रुपयांच्या दंडातून सूट देण्याची विनंती केली होती. मात्र, महानगर आयुक्तांनी ही मागणी फेटाळून लावत दंड कायम ठेवला आहे. निर्धारित मुदतीत काम पूर्ण झाल्यास न्यायालयीन यंत्रणेला मोठा दिलासा मिळणार आहे.

---

# संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील दानपेटीवर सेवेकऱ्यानेच टाकला दरोडा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरातील दानपेटीतून खुद्द मंदिराच्या सेवेकऱ्यानेच रोकड लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विशाल बाळू वारूळे या संशयित सेवेकऱ्यावर आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी या संदर्भात पोलिसांत अधिकृत फिर्याद दिली.**




या घटनेमुळे आळंदीत आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या लाखो भाविकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून मंदिरातील सुरक्षाव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२, १३ आणि १६ मे २०२६ रोजी सायंकाळच्या वेळी दानपेटीतील भाविकांनी अर्पण केलेली रक्कम कॅशियरकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधित सेवेकऱ्यावर सोपवण्यात आली होती. दानपेटीतील हे पैसे बकेटमध्ये भरत असताना, आरोपीने आजूबाजूच्या लोकांची नजर चुकवून संधी साधली. त्याने दानपेटीतील रोकड गुपचूप स्वतःच्या पिशवीत टाकली.

संस्थान प्रशासनाला संशय आल्यानंतर मंदिरातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासण्यात आले आणि अंतर्गत चौकशी करण्यात आली. यामध्ये संबंधित सेवेकऱ्याचे हे कृत्य कॅमेऱ्यात कैद झाल्याने हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. प्राथमिक तपासात या सेवेकऱ्याने तीन दिवसांत मिळून एकूण १५ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, या घटनेनंतर मंदिर प्रशासनाने सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्याच्या हालचाली सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. दानपेटीतील रक्कम जमा करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्याची मागणी भाविकांकडून केली जात आहे. मंदिरातील प्रत्येक व्यवहारावर बारकाईने नजर ठेवण्यासाठी अतिरिक्त CCTV कॅमेरे बसवण्याची मागणीही जोर धरत आहे. काही भाविकांनी संबंधित आरोपीवर कठोर कारवाई करून इतरांसाठी धडा घालण्याची मागणी केली आहे. धार्मिक स्थळातील अशा प्रकारामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या गेल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. मंदिरातील सेवेकऱ्यांची पार्श्वभूमी आणि कामकाजाची नियमित तपासणी व्हावी, अशीही मागणी पुढे येत आहे. या प्रकरणामुळे मंदिर प्रशासनाची प्रतिमा मलिन झाल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. पोलिसांकडून आरोपीची अधिक चौकशी सुरू असून आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

माऊलींच्या समाधी मंदिर परिसरात यापूर्वीही पैसे चोरीच्या काही घटना घडल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. अशा घटना वारंवार घडूनही मंदिर प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस व कठोर पावले उचलली नसल्याने स्थानिक नागरिकांनी आणि भाविकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मंदिरातील दानपेट्यांची मोजणी प्रक्रिया, सीसीटीव्हीद्वारे ठेवली जाणारी देखरेख आणि तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवरील नियंत्रण यामध्ये गंभीर त्रुटी असल्याचा थेट आरोप आता केला जात आहे. याप्रकरणी आळंदी पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.



## भूमिका

**इंधन तुटवडा, महागाई, आर्थिक संकट, बेरोजगारी, पेपरफुटीसह वेगवेगळ्या प्रश्नांमुळे भारतीय जनमानसामध्ये काहीशी अस्वस्थता दिसून येते. विशेषतः देशातील तरुण वर्ग सध्या एका वेगळ्या परिस्थितीतून जात आहे. स्वाभाविकच अशा काळात सरन्यायाधीशांनी केलेले वक्तव्य व त्यांच्या विडंबनार्थ सुरू झालेली चळवळ.**

# ट्रेंड की परिवर्तनाची सुरुवात?




कॉक्रोच जनता पार्टी या संकल्पनेला आता चळवळीचे स्वरुप प्राप्त झाल्याचे पहायला मिळते. मूळच्या छत्रपती संभाजीनगरच्या व सध्या अमेरिकेतील बोस्टनमध्ये राहणाऱ्या अभिजित दीपके या युवकाने सुरू केलेल्या या संकल्पनेला सध्या भारतीय तरुणाईकडून प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसतो. केवळ दोन, तीन दिवसांत सीजेपीचे फॉलोअर्स बीजेपीपेक्षा अधिक वाढल्याची माहिती समोर आली असून, याला वेगळ्या शक्ती कारणीभूत असल्याचे आरोपदेखील होत आहेत. मात्र, एका सोशल चळवळीला इतका भरभरून प्रतिसाद का मिळतो, आपल्यावरील नाराजीचेच हे गमक नाही ना, याचे सत्ताधाऱ्यांनीही आत्मपरीक्षण करावे. तथापि, त्याऐवजी सीजेपीचे एक्स अकाऊंट बंद करण्यातच संबंधितांनी धन्यता मानलेली दिसते. मुळात भारत हा बहुविध व बहुसांस्कृतिक देश आहे. मागच्या सात ते आठ दशकांत देशाने अनेक स्थित्यंतरे अनुभवली. आंदोलने, चळवळी पाहिल्या. त्याचबरोबर अनेकविध राजकीय पक्षांचा उभरता आणि पडता काळही बघितला. आम आदमी पक्ष हे त्याचे अलीकडचे उदाहरण. आप आधी सोशल माध्यमातून पुढे आला, रस्त्यावर उतरला आणि सत्तेला आव्हान देऊ लागला. काँग्रेसप्रणित यूपीए सरकारविरोधात याच अण्णा चळवळीने असंतोष तयार केला. तथापि, पक्षाला सूत्रबद्ध वैचारिक बैठक नव्हती. संघटनात्मक बेस नव्हता. नेतृत्वातील अंतर्विरोध, अनुभवाचा अभाव याही आपमधल्या उण्या बाजू होत्या. त्यामुळे देशात असंतोष पसरवूनही या पक्षाला त्याचा लाभ घेता आला नाही. काँग्रेसविरोधी संतापाची लाट आपने तयार केली, पण त्या लाटेवर स्वार झाला नरेंद्र मोदींचा भाजपा. तिथून पुढचा इतिहास सगळ्यांना ठाऊक आहे. हे बघता कॉक्रोच जनता पार्टीचे काय होते, हे पहावे लागेल. मुळात सोशल मीडिया हँडल चालवणे आणि एखादी चळवळ वा पक्ष चालवणे, यात बरेच अंतर आहे. पेपरफुटी, बेरोजगारी, आर्थिक समस्यांमुळे देशातील तरुण अस्वस्थ असला, तरी या सर्वांना संघटित करणे, दिशा देणे, ही सोपी बाब नाही. त्याकरिता आवश्यक असलेली वैचारिक प्रगल्भता, सातत्य, कार्यक्रम व नेतृत्व क्षमता संबंधितांना दाखवावी लागेल. अन्यथा, ही चळवळ म्हणजे ट्रेंडिंगमधली एक छोटीशी झुळूक ठरण्याचा धोका संभवतो. भारतातील सध्याची राजकीय स्थिती पाहिली, तर भाजपाने अर्धा अधिक भारत व्यापला आहे. अनेक प्रादेशिक पक्ष सध्या शेवटच्या घटका मोजत आहेत. त्यामुळे आगामी काळात अनेक ठिकाणी काँग्रेस विरुद्ध भाजप असा सामना होऊ शकतो.

## प्रासंगिक »

### कोल्हा आणि कासव

**एकदा एका जंगलात एक कोल्हा राहत होता त्याला स्वतःच्या हुशारी बद्दल गर्व होता. तो म्हणत असे, "मी सर्व प्राण्यात हुशार आहे.**

एक दिवस तो अन्नाच्या शोधात निघाला. त्याला काही मिळाले नाही. त्याला भूक सहन झाली नाही. अखेर त्याला एक कासव दिसले. त्याला खुप आनंद झाला. त्याने उडी मारून कासवाला पकडले. कोल्ह्याने कासवाचे कवच फोडण्याचा प्रयत्न केला. पण ते काही फुटेना. कासव धुर्तपणे म्हणाले, "तु मला पाण्यात का बुडवत नाहीस? म्हणजे माझे कवच मऊ होईल व मला तु सहजपणे खाऊ शकशील." भुकेने व्याकुळ झालेल्या कोल्ह्याने, काही विचार न करता कासवाला तळ्यात ढकलले.

कासव कोल्ह्याच्या हातातून सहज निसटले व आनंदाने पाण्यात पोहू लागले. ते तळ्याच्या मध्यभागी गेले आणि म्हणाले, "कोल्ह्या स्वतःला फार हुशार समजू नकोस."

तात्पर्य - जसे पेराल तसेच उगवेल किवा जशास तसे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संयुक्त अरब अमिराती (यूएई), नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांचा ताजा दौरा अनेक कारणांनी चर्चेत राहिला.

# टॉफी आणि बरंच काही!




इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना त्यांनी दिलेली 'मेलडी' चॉकलेटची भेट आणि त्याच्याशी संबंधित व्हिडिओ, नॉर्वेमधील परिषदेत स्थानिक पत्रकार महिलेने प्रश्न विचारण्यावरून निर्माण झालेला वाद या दोन घटना या चर्चेच्या केंद्रस्थानी राहिल्या आणि त्यामुळे देशात सत्ताधारी-विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या आणि माध्यमे-समाजमाध्यमांना भरपूर खाद्य मिळाले हे खरे; परंतु त्यापलीकडे जाऊन या दौऱ्याकडे पहावे लागेल.

हा दौरा व्यापार-गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरण अशा विविध क्षेत्रांसाठी भारताला उपयुक्त ठरणारा होता, यात शंका नाही. बदलत्या काळात परदेशी गुंतवणूक आणणे आणि नवनव्या बाजारपेठा शोधणे, हे आंतरराष्ट्रीय संबंधाचे आधार बनत असल्याने या दौऱ्यात राजनैतिक कूटनीतीऐवजी आर्थिक संबंध दृढ करण्यावर भर देण्यात आल्याचे दिसून आले.

नॉर्डिक देशांतील सुमारे सातशे कंपन्या भारतात; तर सुमारे दीडशे भारतीय कंपन्या त्या देशांमध्ये कार्यरत आहेत. मोदी यांच्या या भेटींमधून हे नाते अधिक दृढ होणार आहे. भारतामध्ये साडेतीन लाख कोटी रुपयांचे गुंतवणुंकीचे करार, हे या दौऱ्याचे सर्वात मोठे फलित. यूएईमध्ये झालेल्या चर्चेत भारतात ४५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झालेच; सोबतच तेल उत्पादक देशांच्या 'ओपेक' संघटनेतून बाहेर पडलेल्या 'यूएई'ने भारतातील पेट्रोलियमच्या राखीव साठ्यासाठी तीन लाख बॅरल कच्च्या तेलाच्या पुरवठ्यास दिलेली मान्यता सध्याच्या ऊर्जासंकटात दिलासादायक ठरावी. नेदरलँड्समधील करारानुसार भारतात सेमीकंडक्टरच्या फॅब्रिकेशनचा प्रकल्पही महत्त्वपूर्ण असेल.

स्वीडनशी द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्यात येणार आहे; तर नॉर्वेमधील बारा करारांत ग्रीन हायड्रोजन, पवनऊर्जा अशा क्षेत्रांतील तंत्रज्ञान भागीदारीचाही समावेश आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेशी झालेल्या कराराने अवकाश संशोधनाला अधिक गती मिळेल. इटलीच्या सहकार्याने 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' बाबत दोन्ही देशांत प्राथमिक एकमत झाले; तसेच दुर्मीळ खनिजविषयक कराराद्वारे संशोधन व विकासाला गती मिळेल.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास!

## शिर्डीतील एकाच कार्यक्रमासाठी दोघांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला दिलेला प्रतिसाद

महाईन्यूज । मुंबई

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, शनिवारी रेल्वे प्रवास करत मुंबईहून शिर्डी गाठली तर शिवसेनेचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी चार्टर विमानाने मुंबई ते शिर्डी असा प्रवास केला. मुख्यमंत्री फडणवीस व मंत्री सामंत शिर्डीतील एकाच कार्यक्रमास आज उपस्थित होते. मात्र दोघांच्या या प्रवासाकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत आवाहनाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात आहे. एकाने दिलेला प्रतिसाद आणि दुसऱ्याने केलेले दुर्लक्ष.**



अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डीजवळील सावळी विहीर येथे ‘ग्लोब फोर्ज’ या खासगी कंपनीच्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन आज सायंकाळी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, संरक्षणदल प्रमुख जनरल अनिल चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणार होते. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस रेल्वे प्रवासाने तर उद्योग मंत्री सामंत विमानाने शिर्डीत दाखल झाले.

पंतप्रधान मोदी यांनी आणि राज्य सरकारनेही इंधन बचतीचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमान प्रवास टाळून भल्या सकाळीच मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस गाठत ६.२० वा. मुंबई ते शिर्डी असा प्रवास वंदे भारत रेल्वेने करुन, सकाळी ११.३० वा. शिर्डी येथिल साईनगर रेल्वे स्थानकावर त्यांचे आगमन झाले. त्यांच्या ताफ्यात पाच वाहने होती.

एरवी विमानतळ अथवा हेलिपॅडवर मुख्यमंत्र्यांचे आगमन होताच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह इतरांची स्वागतासाठी मोठी गर्दी असते परंतु फडणवीस यांच्या स्वागतासाठी शिर्डी रेल्वे स्थानकावरून कुणी येऊ नये असा फतवा मुख्यमंत्री कार्यालयाने काढला होता. त्यानुसार फडणवीस यांचे रेल्वे स्थानकावर केवळ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीच स्वागत केले.

### उद्योग मंत्री उदय सामंत यांचा विमान प्रवास

उद्योग मंत्री सामंत हे शिर्डी येथील कार्यक्रमास मुंबई येथुन चार्टर विमानाने आले व नियोजित कार्यक्रमानुसार ते त्याच विमानाने पुणे येथील कार्यक्रमास रवाना होणार होते तर फडणवीस हे समृद्धी महामार्गावरून मोटारीने नागपूरकडे रवाना होणार होते. मुख्यमंत्री व त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्र्याचा प्रवास विसंवाद या निमित्ताने पुढे आल्याने राजकीय वर्तुळाच चर्चा रंगली होती.

### रेल्वे प्रवासात फाईल तपासल्या

शिर्डीतील साईनगर रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, वंदे भारत रेल्वे ही नव्या भारताची एक अनुपम भेट पंतप्रधान मोदींनी दिली आहे. आज मी या रेल्वेने शिर्डीला आलो, खूप चांगला अनुभव घेता आला, लोकांच्या भेटी झाल्या, रस्त्यात फाईलचे काम करता आले. मला आजचा प्रवास अत्यंत लाभदायी वाटला. जेवढे अनुकरण करता येईल तेवढे प्रत्येकाने करावे, आपण केले तर लोकांना करण्याची इच्छा होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वसामान्य नागरिकांनीही पर्यावरणपूरक आणि वेळेची बचत करणाऱ्या प्रवासाला प्रोत्साहन दिले.

# ऐतिहासिक जलदुर्ग मुरुड-जंजिरा किल्ला ‘या’ दिवसापासून पर्यटकांसाठी बंद

महाईन्यूज । अलिबाग

**कोकण किनारपट्टीवरील अभेद्य जलदूर्ग म्हणून ओळख असलेल्या मुरुड जंजिऱ्याला भेट देण्याचा विचार करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. प्लॅनिंग करण्यापूर्वी जरा थांबा, कारण येत्या मंगळवार पासून हा किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात येणार आहे. पुढील तीन महिन्यांसाठी किल्ला बंद असणार आहे.**



कोकण किनारपट्टीवर आजही सगळ्यात भक्कम स्थितीत असलेला किल्ला म्हणून मुरुड जंजीरा ओळखला जातो. राजपूरी खाडीच्या तोंडावर वसलेला हा किल्ला पाहणे म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणी असते, २२ एकरच्या बेटावर पसरलेला असून, किल्ल्याची तटबंदी ४० फूट उंच आहे. सिद्दी सरदारांनी १५ व्या ते १६ व्या शतकात या किल्ल्याची बांधणी केली. १९ बुरुज असेलेला किल्ला हा अभेद्य किल्ला म्हणून ओळखला जातो. किल्ल्याची रचना अशी आहे की ज्याचे प्रवेशद्वार सहाजासहजी दिसून येत नाही.

आजही राजवाडा, दरबार हॉल मशिद आणि सैनिकांच्या निवासस्थानाचे अवशेष किल्ल्यात पहायला मिळतात. किल्ल्यावर कलाल बांगडी, चावरी आणि लांडाकासम अशा तीन मोठ्या तोफा प्रसिध्द आहेत. हा किल्ला मराठा, पोर्तुगीज, मुघल आणि सिद्दी संघर्षचा साक्षीदार राहीला आहे. मराठा साम्राज्याने हा किल्ला जिंकता यावा यासाठी अनेकदा आक्रमणे केली. छत्रपती संभाजी महाराजांनी जंजिरा किल्ला जिंकण्यासाठी मुरुड जवळ पद्मदूर्ग किल्याची उभारणी केली होती. त्यामुळे या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व मोठे आहे.

दरवर्षी लाखो पर्यटक या किल्ल्याला भेट देण्यासाठी आवर्जून येत असतात. ऑक्टोबर ते मे हा किल्ल्याला भेट देण्याचा उत्तम कालावधी असतो. राजपूरी आणि खोरा अशा दोन बंदरातून किल्ल्याला भेट देता येते . १५ ते २० मिनटे प्रवास होडीने अथवा बोटीने प्रवास करून इथे पोहोचता येते.

शिडाच्या बोटीने किल्ल्याला भेट देणे हा विलक्षण अनुभव असतो, वाऱ्याची दिशा आणि वेग यावर शिड नियंत्रित करून बोट चालक अतिशय कौशल्यपूण पणे पर्यटकांना किल्ल्यात घेऊन जातात. त्यामुळे शिडाच्या बोटींना पर्यटकांची विशेष पसंती मिळते. पण आता किल्ल्याला भेट देण्याचा विचार करत असाल तर थांबा कारण पुढील तीन महिन्यासाठी हा किल्ला पर्यटकांसाठी बंद ठेवला जाणार आहे.

### मेरीटाईम बोर्डाने दिले आदेश

मेरीटाईम बोर्डाने या संदर्भातील आदेश जारी केले आहेत. त्या नुसार हा किल्ला येत्या २६ मे पासून तीन महिन्यांकरता पर्यटकांसाठी बंद केला जाणार आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीला हा किल्ला पून्हा एकदा खूला केला जाणे अपेक्षित आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो, समुद्राला मोठी उधाणे येतात. किनारपट्टीवर वादळी वारे आणि मोठ्या लाटा उसळत असतात. त्यामुळे जलप्रवासी वाहतूक धोकादायक ठरू शकते हीबाब लक्षात घेऊन मेरीटाईम बोर्डाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. राजपूरी आणि खोरा बंदरातून किल्ल्यावर जाण्यासाठी शिडाच्या आणि इंजिनच्या बोटी उपलब्ध असतात.

# पंतप्रधान मोदींना अमेरिका भेटीचं निमंत्रण!


## सचिव मार्को रुबियो यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावतीने अमेरिका भेटीचं निमंत्रण दिलं

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो हे सध्या भारत दौऱ्यावर आहेत. मार्को रुबियो यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत भेट घेतली आहे. यावेळी मार्को रुबियो आणि पंतप्रधान मोदी यांच्यात सुरक्षा आणि व्यापार या विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली आहे. मार्को रुबियो यांच्या या भारत दौऱ्यात काही महत्वाचे करार होण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, सचिव मार्को रुबियो यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावतीने पंतप्रधान मोदी यांना अमेरिका भेटीचं निमंत्रण दिलं आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्को रुबियो यांच्याबरोबर सुरक्षा आणि व्यापार या विषयांवर चर्चा केली आहे. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत या संदर्भातील माहिती दिली आहे.

सचिव मार्को रुबियो यांनी आज दिल्लीत पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. मार्को रुबियो आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीनंतर भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी म्हटलं की, "सुरक्षा, व्यापार आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये अमेरिका आणि भारत यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या पार्श्वभूमीवर सकारात्मक चर्चा झाली. ही अशी क्षेत्र आहेत, जी आपल्या दोन्ही राष्ट्रांना मजबूत करतात आणि मुक्त व खुल्या इंडो-पॅसिफिकला पुढे नेतात. भारत हा अमेरिकेसाठी एक महत्त्वाचा भागीदार आहे", असं सर्जिओ गोर यांनी म्हटलं आहे.



### पंतप्रधान मोदींना अमेरिका भेटीचं निमंत्रण

आज मार्को रुबियो यांनी दिल्लीत पंतप्रधान मोदींची भेट घेतली. या भेटीत मोदी आणि मार्को रुबियो यांच्यात अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांना 'व्हाईट हाऊस'च्या भेटीसाठी आमंत्रित करण्यात आलं आहे. मार्को रुबियो यांनी ट्रम्प यांचा निरोप पोहोचवला आहे. याबाबत भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी म्हटलं की, "राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावतीने परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी पंतप्रधान मोदी यांना नजीकच्या काळात 'व्हाईट हाऊस'ला भेट देण्याचं निमंत्रण दिलं आहे."

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनीही मार्को रुबियो यांच्या भारत दौऱ्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं की, "अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांचं नवी दिल्लीत स्वागत आहे. त्यांच्या भेटीमुळे भारत-अमेरिका व्यापक जागतिक सामरिक भागीदारीला अधिक बळकटी मिळेल."

अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो रविवारी भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. तसेच मार्को रुबियो हे नवी दिल्लीत होणाऱ्या 'क्वाड' परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीलाही उपस्थित राहणार आहेत. या बरोबरच या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि दोन्ही देशांतील संबंध दृढ करणं यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्याची शक्यता आहे. तसेच पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक ऊर्जा पुरवठा या विषयांवर देखील चर्चा होण्याची शक्यता आहे.

> "मार्को रुबियो यांचं भारतात स्वागत करताना आनंद झाला. आम्ही भारत-अमेरिका व्यापक जागतिक सामरिक भागीदारीमधील सातत्यपूर्ण प्रगती तसेच प्रादेशिक आणि जागतिक शांतता व सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा केली. भारत आणि अमेरिका जागतिक हितासाठी एकत्रितपणे काम करत राहतील"
>
> \- नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

---

# इराण होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर टोल लावणार, जागतिक व्यापारावर दूरगामी परिणाम होणार?

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळवले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याने जगात इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. जगाला लागणाऱ्या २० ते २५ टक्के कच्च्या तेलाचा व नैसर्गिक वायूचा पुरवठा याच सामुद्रधुनीमार्गे तेल वाहतूक करणाऱ्या जहाजांमधून केला जातो. आता इराणने होर्मुझवरील पकड आणखी घट्ट केली आहे.**



जहाजांवर नियंत्रण, देखरेख ठेवण्यासाठी इराणने एक प्राधिकरणच स्थापन केले आहे. 'द पर्शियन गल्फ स्ट्रेट ऑथोरिटी' (PGSA) असे नाव त्याला देण्यात आले आहे. यापुढे होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर पर्शियन गल्फ स्ट्रेट ऑथोरिटी नियंत्रण ठेवणार आहे. २२ हजारांहून अधिक चौरस किमी क्षेत्रावर PGSA चे नियंत्रण असेल. यूएई तसेच ओमान या देशांच्या सागरी किनाऱ्यांपर्यंत सागरी हालचालींवर नियंत्रण ठेवले जाईल, अशी घोषणा इराणने केली आहे. इराणने घेतलेल्या निर्णयाने इराणची स्थिती अमेरिकेबरोबर सुरू असलेल्या वाटाघाटीत आणखी भक्कम झाली आहे. PGSA नेमकं काय करणार आहे? होर्मुझ सामुद्रधुनीवर अशा प्रकारची व्यवस्था उभारणे कायद्यानुसार योग्य आहे का? याचा जगावर कसा परिणाम होईल?

होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर करायचा असल्यास जहाजांना इराणच्या लष्कराशी संवाद साधावा लागेल, असे इराणने स्पष्ट केले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेला – इराणमधील कुह मोबारक ते यूएईमधील फुजैराहचा दक्षिण भाग आणि होर्मुझ सामुद्रधुनीच्या पश्चिमेला इराणमधील कश्म बेटाचे टोक ते यूएईमधील उम्म-अल-कैवैन पर्यंतचा भाग PGSA च्या नियंत्रणात असणार आहे. ज्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून जायचे आहे त्यांना PGSA ला ईमेल पाठवावा लागणार आहे. त्या ईमेलमध्ये जहाजाचा क्रमांक, मूळ देश, त्यात असलेले सामान आणि कोणत्या देशांमधील क्रू मेम्बर्स आहेत, याची माहिती द्यावी लागणार आहे. त्यानंतरच PGSA कडून जहाजाला परवानगी दिली जाईल व टोल आकारला जाईल. जहाजांना अशाप्रकारे टोल आकारण्याची कायद्याने परवानगी नाही. परंतु, याबाबत आता दावे-प्रतिदावे केले जात आहेत. UNCLOS नुसार, होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर "आंतरराष्ट्रीय नौकानयनासाठी" आहे. त्यामुळे त्यावर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. इराणने UNCLOS च्या जाहीनाम्यावर स्वाक्षरी केली आहे.

### जागतिक व्यापारावर दूरगामी परिणाम होणार?

जगासाठी सर्वात चिंतेची बाब म्हणजे PGSA च्या कामकाजात पारदर्शकतेचा अभाव व आकारल्या जाणाऱ्या टोलची रक्कम ही आहे. इराणला आपल्या मित्र देशांकडून आणि जे देश मित्र नाहीत त्यांच्याकडून किती टोल वसूल करायचे, याचे अमर्याद अधिकार मिळू शकतात. १ मे रोजी अमेरिकेच्या 'फॉरेन ऑफिस ऑफ ॲसेट्स कंट्रोल'ने (OFAC) विविध देशांना होर्मुझ सामुद्रधुनीबाबत कठोर इशारा दिला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत सुरक्षित वाहतुकीसाठी इराणला पैसे देणाऱ्या देशांना कठोर निर्बंधांना सामोरे जावे लागेल, असा इशारा अमेरिकेने दिला आहे. त्यामुळे अनेक देशांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

# कान्समध्ये पुन्हा ऐश्वर्याची जादू!



जागतिक पातळीवरील प्रतिष्ठेचा मानला जाणारा कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ यंदाही भारतीय कलाकारांच्या उपस्थितीने रंगला आहे. मात्र, चाहत्यांचे सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन हिच्या ग्लॅमरस अंदाजाने. शुक्रवारी उशिरा तिचा दुसरा लुक समोर आला आणि सोशल मीडियावर पुन्हा एकदा तिची जोरदार चर्चा सुरू झाली. याआधी ऐश्वर्या निळ्या रंगाच्या गाऊनमध्ये रेड कार्पेटवर दिसली होती. त्या लुकनंतर आता तिचा हलक्या गुलाबी रंगातील गाऊन चाहत्यांना पाहायला मिळाला. या गाऊनसोबत तिने त्याच रंगाचा स्टायलिश केप कॅरी केला होता. गाऊनवरील सुंदर ड्रेपिंग आणि एलिगंट डिझाइनमुळे तिचा लुक अत्यंत आकर्षक दिसत होता. दागिन्यांमध्ये ऐश्वर्याने डायमंड रिंग्स आणि सुंदर इअररिंग्ज घातले होते. तिने केस मोकळे ठेवले होते आणि अगदी नैसर्गिक मेकअप केला होता. तिच्या या साध्या पण राजेशाही लुकवर चाहते अक्षरशः फिदा झाले. सोशल मीडियावर अनेकांनी तिला पुन्हा "कान्सची क्वीन" असे संबोधले. यावेळी आणखी एक गोष्ट चर्चेत आली, ती म्हणजे तिची मुलगी आराध्या बच्चन हिचा खास अंदाज. अनेक वर्षांपासून आराध्या आईसोबत कान्स फेस्टिव्हलला दिसते, पण यंदा तिचा लुक सर्वांसाठी सरप्राइज ठरला. रेड रंगाच्या गाऊनमध्ये आराध्या खूपच आत्मविश्वासपूर्ण दिसत होती. तिनेही गाऊनसोबत लाल रंगाचा केप कॅरी केला होता. रेड कार्पेटवर आईसोबत दिलेल्या तिच्या पोझेस सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत.




# 'देऊळ बंद 2' सिनेमाची तूफान कमाई!

मराठी चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता निर्माण करणारा 'देऊळ बंद २' अखेर गुरुवारी, २१ मे रोजी प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांकडून या चित्रपटाला दमदार प्रतिसाद मिळताना दिसत आहे. तब्बल ११ वर्षांनंतर 'देऊळ बंद'चा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला आल्यामुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी अनेक ठिकाणी चित्रपटाचे शो हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. देशभरातील जवळपास ५०० सिनेमागृहांमध्ये 'देऊळ बंद २'चे २००० हून अधिक शो प्रदर्शित करण्यात आले आहेत. बॉक्स ऑफिस कलेक्शनबाबत बोलायचे झाल्यास, ट्रेड वेबसाइट सॅकनिल्कच्या अहवालानुसार 'देऊळ बंद २'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी देशभरात सुमारे ३.१६ कोटी रुपयांची कमाई केली आहे. तर चित्रपटाचे नेट कलेक्शन अंदाजे २.६८ कोटी रुपये इतके झाले आहे. मराठी चित्रपटासाठी ही ओपनिंग दमदार मानली जात असून येत्या विकेंडला चित्रपटाच्या कमाईत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# "ती महाराष्ट्रात वाढली, पण तरीही" रवि किशनकडून माधुरीचं कौतुक





बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित तिच्या आगामी 'मा बहन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. प्रेक्षक या डार्क कॉमेडी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. नुकताच चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, ट्रेलरला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या चित्रपटात माधुरी दिक्षितसोबत दोन महत्वाच्या कलाकारांच्या विशेष भूमिका आहेत. एक म्हणजे सध्याची आघाडीची अभिनेत्री तृप्ती डिमरी आणि दुसरा म्हणजे अभिनेता रवी किशन. या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात अभिनेता रवि किशनने माधुरी दीक्षितचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमात एका पत्रकाराने रवी किशनला "तुमचा 'जिंदगी झंडवा फिर भी घमंडवा' हा संवाद खूप प्रसिद्ध झाला आहे. आता अभिमान बाळगण्याची वेळ आली आहे, कारण माधुरीजी तुमच्यासोबत आहेत." असा प्रश्न केला. या प्रश्नावर अभिनेत्याने त्याच्या नेहमीच्या खास शैलीत उत्तर देत माधुरी दीक्षितचे कौतुक केले."तिच्यासोबत (माधुरी दीक्षित) काम करताना अभिमान विसरा, तुम्ही फक्त तिचे कौतुकच करू शकता. तिने कानपुरीया, भोजपुरी, गोरखपुरीया किंवा बनारसी भोजपुरी, म्हणजेच भोजपुरीचा आत्मा, ती इतक्या सुंदरपणे बोलली आहे, असे कौतुकाचे उद्गार काढले. तिने इतकी मेहनत आणि परिश्रम घेतले आहेत की ती महाराष्ट्रीयन आहे असे वाटतच नाही. ती महाराष्ट्रात वाढली, पण तरीही ती एक भोजपुरी मुलगी आहे असे वाटेल. म्हणून माधुरी मॅडम, तुम्ही माझा स्वाभिमान धुळीस मिळवला आहे. तुम्ही त्याचे अक्षरशः तुकडे तुकडे केले आहेत.' अशी मिश्किल टिप्पणीही रवी किशन यांनी केली. 'मा बहन' या चित्रपटाचे दिग्दर्शन सुरेश त्रिवेणी यांनी केले आहे. अभिनेत्री तृप्ती डिमरी देखील यात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सोशल मीडिया स्टार धारणा दुर्गा देखील या चित्रपटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हा चित्रपट ४ जून २०२६ रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार असून, चाहते माधुरीला एका वेगळ्या भूमिकेत पाहण्यासाठी उत्सुक झाले आहेत.

# रजतने मोडला ख्रिस गेलचा रेकॉर्ड!

## IPLमध्ये सर्वात जलद १०० षटकार खेचणारे फलंदाज

**महाईन्यूज । भोपाळ**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला पहिल्यांदाच आयपीएलची ट्रॉफी जिंकून देणारा कर्णधार रजत पाटीदार आयपीएल २०२६ स्पर्धेतही दमदार फॉर्ममध्ये आहे. या हंगामातही संघाला गरज असताना त्याने मधल्या षटकांमध्ये तुफान फटकेबाजी केली आहे. या कामगिरीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुणतालिकेत अव्वल स्थान गाठलं आहे. या संघाचा साखळी फेरीतील शेवटचा सामना सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध पार पडला. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात आरसीबीचा संघ २५६ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. पण आरसीबीला हा सामना ५५ धावांनी गमवावा लागला. सामना जरी गमावला असला तरी रजत पाटीदारने एका मोठ्या रेकॉर्डमध्ये ख्रिस गेलला मागे टाकलं आहे.**



रजत पाटीदार हा मोठ मोठे फटके खेळण्यासाठी ओळखला जातो. फिरकी गोलंदाजांविरुद्ध फलंदाजी करताना तो जागेवरूनच मोठे फटके खेळण्याची क्षमता ठेवतो. सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने षटकारांचा एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. त्याने सर्वात जलद १०० षटकार मारण्याच्या रेकॉर्डमध्ये ख्रिस गेलला मागे टाकलं आहे. त्याने अवघ्या ९३३ चेंडूंचा सामना करत १०० षटकार पूर्ण केले आहेत. तर ख्रिस गेलने ९४३ चेंडूत १०० षटकार पूर्ण केले होते. या स्पर्धेत सर्वात जलद १०० षटकार खेचण्याचा रेकॉर्ड हा आंद्रे रसेलच्या नावावर आहे. त्याने ६५७ चेंडूत १०० षटकार खेचले होते.




# टी-२० वर्ल्ड कप मिशनसाठी हरमनप्रीत ब्रिगेड इंग्लंडला रवाना

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाच्या यजमानपदाखाली रंगणाऱ्या आयसीसी महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेला १२ जूनपासून सुरुवात होत आहे. या स्पर्धेसाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ शनिवारी, २३ जून रोजी इंग्लंडला रवाना झाला. 'गो फॉर ग्लोरी, फिनिश द स्टोरी!', 'हमारी छोरियां छोरों से कम हैं के...' अशा फलकबाजीसह भारतीय चाहत्यांनी टी-२० वर्ल्ड कप मिशनसाठी हरमनप्रीत ब्रिगेडला शुभेच्छा दिल्याचे पाहायला मिळाले.**



भारतीय महिला संघ पाकिस्तानविरुद्धच्या हायहोल्टेज लढतीनं टी-२० वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात करणार आहे. हा बहुप्रतिक्षीत सामना इंग्लंडमधील एजबेस्टनच्या मैदानात १४ जूनला खेळवण्यात येणार आहे. त्यानंतर भारतीय संघ लीड्सच्या मैदानात नेदरलँड्सशी भिडणार असून तिसऱ्या सामन्यात त्यांच्यासमोर दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे आव्हान असेल. हा सामना मँचेस्टरच्या मैदानात नियोजित आहे. याच मैदानात बांगलादेशविरुद्धचा सामना खेळल्यावर भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध साखळी फेरीतील अखेरचा लॉर्ड्सच्या मैदानात खेळताना दिसेल.

टी-२० वर्ल्ड कपपूर्वी हरमनप्रीत कौर म्हणाली की, सध्याच्या भारतीय महिला संघात टी-२० वर्ल्ड कप जिंकण्याची क्षमता आहे. फक्त यासाठी संघाने कोणताही दबाव किंवा अति आत्मविश्वास न बाळगता संतुलित राहून सर्वोच्च टी-२० क्रिकेट खेळण्याची गरज आहे.

टी-२० वर्ल्ड कपपूर्वी भारतीय महिला संघ इंग्लंडविरुद्ध तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. २८ मे रोजी या मालिकेला सुरुवात होईल. ३० मे रोजी या मालिकेतील दुसरा टी-२० सामना खेळवण्यात येणार असून २ जून रोजी तिसरा आणि अखेरचा सामना नियोजित आहे.



## ICC महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेचे भारतीय संघाचे वेळापत्रक

भारत विरुद्ध पाकिस्तान, १४ जून २०२६, एजबेस्टन
भारत विरुद्ध नेदरलँड्स, १७ जून २०२६, हेडिंग्ले
दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारत, २१ जून २०२६, ओल्ड ट्रॅफर्ड
भारत विरुद्ध बांग्लादेश, २५ जून २०२६, ओल्ड ट्रॅफर्ड
ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत, २८ जून २०२६, लॉर्ड्स

## भारतीय महिला संघ :

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, शेफाली वर्मा, जेमिमा रोड्रिग्स, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यस्तिका भाटिया, नंदनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंह, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव.

# कुदळवाडीत ग्रामस्थ व पोलिस प्रशासनाची संयुक्त बैठक

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**कुदळवाडी परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ग्रामस्थ, घरमालक आणि पोलिस प्रशासनाची संयुक्त महत्वपूर्ण बैठक विठ्ठल मंदिर, कुदळवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.**

या बैठकीस चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत परिसरातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन कायम तत्पर असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक घरमालकाने आपल्या भाडेकरूंची संपूर्ण माहिती पोलिसांकडे नोंदविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

या बैठकीत वाढती लोकसंख्या, बाहेरून येणाऱ्या नागरिकांची पडताळणी, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, सीसीटीव्ही यंत्रणेचा प्रभावी वापर, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, वाहतूक समस्या तसेच सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी नागरिकांच्या अडचणी व समस्या जाणून घेत त्यावर योग्य तो समन्वय साधण्याचे आश्वासन दिले. परिसर गुन्हेमुक्त आणि सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिक व पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीस परिसरातील अनेक घरमालक, व्यापारी, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. नागरिकांनीही विविध समस्या मांडत पोलिस प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आणि भविष्यातही पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. कुदळवाडी परिसर सुरक्षित, शांततामय आणि गुन्हेमुक्त ठेवण्यासाठी अशा बैठका नियमितपणे आयोजित करण्याची मागणी नागरिकांनी यावेळी केली.

या बैठकीस रमेश मोरे, दिनेश यादव, किशोर बालघरे, गुलाब मोरे, बाळासाहेब मोरे, उत्तम बालघरे, दिपक ठाकुर, अनिल यादव, विशाल बालघरे, दत्तात्रय हरगुडे, विजयराज यादव, दादा मोरे, निखील मोरे, अमोल बालघरे, बापू होले, गणेश बालघरे, निलेश यादव, तानाजी मालुसरे, संदीप पवार, ज्ञानेश्वर आरुडे, प्रतीक मोरे, योगेश यादव, अमित बालघरे, विशाल बनसोडे, सोमनाथ यादव, दिपक घन, विकास यादव, सागर बालघरे, आकाश किवळे, दिनेश मोरे, किरण यादव, गणेश यादव, लक्ष्मण सगळे, नन्र्या बांदल, गणेश मोरे आणि हर्षवर्धन मोरे आदी भूमिपुत्र उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार नगरसदस्य तथा भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी मानले.





D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*



**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# रक्षक चौकातील उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला!

## आमदार शंकर जगताप यांच्या पत्राची महापालिका प्रशासनाकडून तात्काळ दखल

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे निलख येथील रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर तो सर्वसामान्य नागरिकांच्या आणि वाहनचालकांच्या सोयीसाठी तात्काळ खुला करण्यात यावा, यासाठी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला होता. आमदार जगताप यांच्या या पत्राची महापालिका प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली आहे. प्रशासनाने तत्परता दाखवत सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक प्रक्रिया पूर्ण करून हा उड्डाणपूल सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला केला आहे. त्यामुळे या परिसरातील दीर्घकालीन वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**



रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असले तरी तो वाहतुकीसाठी खुला न झाल्याने या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. यामुळे स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांना रोज तासनतास कोंडीचा आणि वेळेच्या अपव्ययाचा सामना करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी थेट महापालिका आयुक्तांना पत्र लिहून संबंधित विभागामार्फत आवश्यक असणारे सुरक्षा ऑडिट व तांत्रिक तपासणी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. तसेच हा उड्डाणपूल जाहीर वापरासाठी जलदगतीने खुला करण्याबाबत पत्रात नमूद केले होते.

आमदारांच्या या पत्राला प्रशासनाने तात्काळ प्रतिसाद दिला आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करून हा मार्ग खुला केला. या उड्डाणपुलामुळे आता औंध ते सांगवी फाटा आणि रावेतपासून पुढे किवळेपर्यंतचा प्रवास अधिक वेगवान, सुटसुटीत आणि सिग्नलमुक्त झाला आहे. तसेच औंध बीआरटी रस्त्यावरील वाहतूक कोंडी पूर्णपणे सुटण्यास मदत झाली आहे.

या संदर्भात बोलताना महापालिकेच्या सहशहर अभियंता संध्या वाघ यांनी प्रशासकीय भूमिकेची माहिती दिली. आमदार शंकर जगताप यांच्या पत्राची दखल घेत महापालिकेने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, पावसाळा जवळ येत असल्याने आणि पुलाखालील सेवा रस्त्यांच्या (सर्व्हिस रोड) दुरुस्तीच्या कामांमुळे या भागात वाहतुकीवर प्रचंड ताण येत होता. आगामी काळातील हा वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन आमदारांनी महापालिकेकडे पत्र पाठवून हा पूल तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत कळवले होते. दरम्यानच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यामुळे पुलाचे औपचारिक उद्घाटन करणे शक्य नव्हते, त्यामुळे तांत्रिक गोष्टींमध्ये हा पूल अडकून पडला होता.

परंतु, ही सर्व परिस्थिति आणि आमदारांच्या पत्राची दखल घेत महापालिकेने तातडीने हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा निर्णय घेतला. त्यातच सबवेचे (अंडरपास) काम सुरू करण्यात आल्यामुळे या पुलावरून वाहतुकीला डायव्हर्शन देण्यात आले असून, यामुळे वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### नागरिकांनी मानले आभार

आमदार शंकर जगताप यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्येची दखल घेऊन केलेल्या यशस्वी पाठपुराव्याबद्दल आणि महापालिकेच्या गतिमान भूमिकेबद्दल पिंपळे निलख परिसरातील नागरिकांनी आणि वाहनचालकांनी समाधान व्यक्त करत महापालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## थेरगावात कोयत्यांचा थरार; "आम्ही पिंपरी-चिंचवडचे भाई" म्हणत तरुणावर जीवघेणा हल्ला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडच्या थेरगाव परिसरात मध्यरात्री कोयत्यांचा थरार पाहायला मिळाला असून तिघा तरुणांनी एका युवकावर जीवघेणा हल्ला करत परिसरात दहशत निर्माण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी काळेवाडी पोलिसांनी दोघांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे.**






ही घटना २१ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास जगतापनगर लेन क्रमांक ४ आणि ५ मधील समर्थ क्लिनिकसमोर घडली. याप्रकरणी सौरभ विलास चौधरी (वय २४, रा. थेरगाव) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ चौधरी हे त्यांच्या मित्रांसोबत परिसरात उभे राहून गप्पा मारत असताना आरोपी गौरव उर्फ नन्या गौतम वाघमारे (रा. आनंदनगर झोपडपट्टी, चिंचवड), रितेश क्षीरसागर आणि त्यांचा एक साथीदार दुचाकीवरून तेथे आले. किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद अचानक हिंसक बनला.

आरोपी गौरव वाघमारे याने कमरेतील लोखंडी कोयता काढून सौरभ यांच्या डोक्यावर आणि हातावर वार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर दुसऱ्या आरोपीनेही कोयत्याने हल्ला केला, तर तिसऱ्या साथीदाराने फिर्यादीच्या हातावर वार करत गंभीर जखमी केले.

हल्ल्यानंतर आरोपींनी परिसरात उघडपणे कोयते फिरवत "आम्ही पिंपरी-चिंचवडचे भाई आहोत, कोणात दम असेल तर समोर या," अशी धमकी देत दहशत माजवल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीच्या मित्रांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करताच त्यांनाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

या प्रकरणी काळेवाडी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

# दोन वर्षात काळेवाडीचा सर्वांगीण कायापालट करणार!

## आमदार शंकर जगताप; विनोद नढे यांच्या पुढाकाराने काळेवाडीच्या विकासाला गती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहिलेल्या काळेवाडी परिसराचा येत्या दोन वर्षांत सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्धार आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमध्ये महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**



प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक विनोद नढे यांच्या पुढाकारातून आयोजित या बैठकीत काळेवाडी परिसरातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विकास आराखडा, रखडलेली आरक्षणे, रस्ते, नाले, पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्यान, क्रीडांगणे आणि रुग्णालय यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत नियोजन करण्यात आले.

नगरसेवक विनोद नढे यांनी सांगितले की, महापालिकेच्या धोरणांमुळे काळेवाडी परिसर अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिला. मात्र आता आमदार शंकर जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

"काळेवाडीचा विकास करताना नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यावर विशेष भर दिला जाणार आहे," असेही विनोद नढे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. काळेवाडी परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडवून विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

> पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता दर्जेदार रस्ते व पूल प्रकल्प वेळेत पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना सुरक्षित, जलद आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधत विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. रावेत परिसरातील प्रस्तावित पूल आणि इतर रस्ते प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

# पालखी सोहळा मार्ग तसेच विसावा ठिकाणांची महापालिका आयुक्तांनी केली पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील उत्साहात स्वागत करण्याची तयारी महानगरपालिकेच्या करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे स्वागत निगडी येथील भक्ती शक्ती चौकात केले जाते. यानंतर हा सोहळा आकुर्डी येथे मुक्कामी दोन्ही ठिकाणांची तसेच पालखी मार्गाची पाहणी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली. तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत दिघी येथील मॅगझिन चौकात केले जाते. या पालखी सोहळ्याच्या विसाव्याच्या ठिकाणासह महापालिका क्षेत्रातील कार्यक्षेत्रातील संपूर्ण पालखी मार्गाची पाहणी देखील आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते.**



> आषाढीवारी पालखी सोहळ्यानिमित्त महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची सर्व संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. तसेच पालखी मुक्काम, विसावा तसेच या मार्गावर सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आवश्यक सोयीसुविधांचे प्रभावी नियोजन करून सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाशी योग्य समन्वय ठेवून कामकाज करावे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका.**

या पाहणी दौऱ्यामध्ये अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल आदी सहभागी होते.


निगडी येथील भक्ती शक्ती चौक येथे महापालिकेच्या वतीने जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाच्या स्थळाची आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी पाहणी करून माहिती घेतली. यावेळी मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, मनोज सेठिया, उप आयुक्त प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता अजय सुर्यवंशी, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आरोग्याधिकारी सीताराम गायकवाड तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उप आयुक्त विवेक पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश नांदुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निता गायकवाड यांच्यासह महामेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

यानंतर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आकुर्डी येथील संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या मुक्कामाच्या ठिकाणाची पाहणी केली. तसेच दिंड्याच्या मुक्कामाचे ठिकाण असलेल्या महापालिकेच्या मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथील पालखी विसावा ठिकाणाची पाहणी केली. यावेळी क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, कार्यकारी अभियंता वैशाली ननवरे आदी उपस्थित होते.

आकुर्डी येथील विसावा ठिकाणांची पाहणी केल्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणांचीही पाहणी केली व तेथे पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला. यावेळी माहिती देण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी पुजा दुधनाळे, कार्यकारी अभियंता उमेश मोने, पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील आदी उपस्थित होते.

आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथे दिंड्यांचा मुक्काम असतो. याठिकाणी शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणीही त्यांनी पाहणी केली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मोशी येथील मॅगझीन चौक येथे महापालिकेच्या वतीने स्वागत करण्यात येते. याठिकाणी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाबाबतची देखील माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाहणी करून माहिती घेतली. यावेळी सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे, कार्यकारी अभियंता शिवराज वाडकर आदी उपस्थित होते. तसेच थोरल्या पादुका मंदिर या विसावा ठिकाणासही भेट देऊन तेथे देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा यावेळी घेण्यात आला.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in